ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – V Sept – Oct 2023

OPEN ACCESS Original Research Article

**प्रस्तावना:**

आज रोजी भारताची लोकसंख्या १४२ कोटी असून एकूण लोकसंख्येपैकी उपलब्ध कार्यकारी लोकसंख्या म्हणजेच रोजगारक्षम मनुष्यबळ आज ६७.८ टक्के आहे. भारतातील तरुणांची संख्या ४७ टक्केपेक्षा जास्त आहे परंतु सर्वांनाच रोजगाराची संधी प्राप्त होते असे नाही किंवा रोजगार उपलब्ध असूनही श्रमिक वयोगटातील सर्वच व्यक्ती कामकरण्यास उस्तुक असतात असे नाही. म्हणून बेरोजगारीच्या संदर्भात डॉ. प्रदीप आगलावे यांनी बेरोजगारीची संकल्पना योग्य रीतीने स्पष्ट केलेली आहे. "दैनंदिन जीवनात 'बेरोजगार' हा शब्ध वापरला जातो. बेरोजगार म्हणजे रोजगार नसणे. या अर्थाने 'बेरोजगार' या संबंधाचा उपयोग केला जातो. परंतु 'बेरोजगार' या शब्दाचा खरा अर्थ स्पष्ट होत नाही. कारण ज्याला काम करण्याची इच्छा नाही, जो व्यक्ती आळशी आहे, अशा व्यक्ती देखील बेरोजगार समजल्या जातील." १५ ते ६० वयोगटातील व्यक्तींच्या आळस व बेफिकिरीमुळे बेरोजगारी दिसते. त्याच प्रमाणे श्रम करण्याची तयारी असूनही तरुणांना रोजगार मिळत नाही. म्हणूनही बेरोजगारी निर्माण झालेली दिसते. तेव्हा बेरोजगारीची नेमकी व्याख्या पाहणे आवश्यक आहे.

**उद्दीष्ट्ये:**

१. भारतातील सद्य स्थितीला उपलब्ध असलेल्या श्रमिक मनुष्य बळाचा परिचय करून देणे.
२. भारतातील उपलब्ध रोजगार क्षेत्रांचा आढावा घेणे.
३. बेरोजगारीचे कारणे सांगून समस्याचा अभ्यास करणे
४. बेरोजगारीचे आर्थिक सामाजिक परिणामांचा अभ्यास करणे

**गृहीतके:**

१. शिक्षित रोजगारांना काम मिळत नाही.
२. कोरोनाच्या काळात भारतातील बेरोजगारीचा दर वाढला होता तो आता कमी झालेला आहे.
३. १५ ते ६० वयोगट असलेल्या लोकसंख्येत नोकऱ्या असलेल्यांची संख्या घटली आहे.
४. गरीब व अकुंशल कामगारांमध्ये तसेच जास्त शिकलेल्यांमध्ये बेरोजगारीची संख्या जास्त आढळते.

**बेरोजगारी व्याख्या आणि स्वरूप:**

श्रमशक्ती असलेल्या श्रमिक वयोगटातील व्यक्तींना रोजगार प्राप्त होत नाही. तेव्हा त्यांना बेरोजगार असे मानले जाते. हि बेरोजगारी अनेक क्षेत्रात आढळत असून संघटित आणि असंघटित असे त्या कार्यशक्तीचे विभाजन केले जाते. संघटित क्षेत्रात कामगार वर्गाचा समावेश होतो तर असंघटित क्षेत्रामध्ये शेतकरी, शेतमजूर आणि भाडोत्री कामगार यांचा उल्लेख केला जातो. त्यांच्या संदर्भात बेरोजगारीचा विचार करतांना पुढील व्याख्या दिलेल्या आहेत.

१. "रोजगार नसलेल्या परंतु रोजगार मिळावा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला बेरोजगार म्हणता येईल. रोजगार मिळवण्यासाठी उत्सुक असलेली हि व्यक्ती त्यासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या समर्थ असावी, तिची काम करण्याची इच्छा असावी, तसेच समाजातील प्रचलित वेतन दारावर काम करण्याची तिची इच्छा असावी. या तिन्ही अटी पूर्ण केल्यानंतरही रोजगार न मिळालेल्या व्यक्तीला बेरोजगार म्हणता येईल."
2. *"Includes people who are not in a paid job, but who are actively looking for work."*
3. *"The number or percentage of people in a country or area who do not have jobs."*

काम करण्याची क्षमता असूनही काही व्यक्ती काम करीत नाहीत याउलट काही व्यक्ती कामकारण्याची तयारी दर्शवितात पण त्यांना अपेक्षित काम आणि वेतन न मिळाल्याने ते काम करण्यास उत्सुक नसतात तर काही श्रमिक लोक कोणतेही काम आणि कोणत्याही वेतनावर करण्यास तयार असतात. मात्र त्यांना काम मिळत नाही. असे हे वेगवेगळ्या प्रकारचे श्रमिक असून त्यांच्यामुळे बेरोजगारीची संख्या अधिक वाढलेली दिसते.१५ ते २५ वयोगटातील शिक्षण घेणारे विद्यार्थी, गृहिणी, कुटुंबातील वयोवृद्ध, भिकारी आणि साधुसंत तसेच शिक्षण म्हणजेच नोकरी मानून कष्टाची कामे टाळणारा उच्च शिक्षित तरुण वर्ग यांची संख्या बेरोजगार म्हणून अधिक आहे. कुटुंबातील एकाच्या श्रमावर तीन ते चार व्यक्ती काम न करता श्रमव्यय करत असतात. मात्र रोजगाराच्या माध्यमात उत्पन्न मिळवून स्वतःच्या व कुटुंबाच्या गरजा पूर्ण करणे भाग असते. नाही तर दारिद्र वाटेला येते. सर्वांनाच समृद्धपणे जगता यावे म्हणून व्यक्तीच्या ठिकाणी काम करण्याची इच्छा व क्षमता असली पाहिजे रोजगाराच्या संधीच्या शोधात राहून ती मिळवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत असे असूनही जर रोजगार मिळत नसेल तेव्हा ती गंभीर स्वरूपाची बेरोजगारी ठरते.

**बेरोजगारीचे प्रकार:**

श्रमिक वयोगटातील बेरोजगार हे ग्रामीण आणि शहरी, शिक्षित आणि अशिक्षित अशा दोन्ही प्रकारचे असतात. ज्ञान, कौशल्य आणि व्यवसाय यानुसार ते कामाच्या शोधात असतात. त्यांच्या समोर असलेल्या रोजगाराची क्षेत्र पाहता त्यात त्यांना प्रवेश मिळतोच असे नाही म्हणून बेरोजगारीचे काही प्रकार पडतात.

**औद्योगिक बेरोजगारी :**

अलीकडच्या काळात ग्रामीण भागातील तरुणवर्ग हा मोठ्या प्रमाणात नोकरी शोधण्यासाठी शहराकडे स्थलांतरित झालेला आहे. परंतु शासनाचे औद्योगिक धोरण, संपुष्ठात आलेले लघु उद्योग, औद्योगिक विकासाची मंदावलेली गती अशा काही कारणांमुळे औद्योगिक क्षेत्रात बेरोजगारी आढळून येते. मजुरांची संख्या जास्त असूनही सर्वांनाच औद्योगिक क्षेत्रात कामगार म्हणून सामावून घेण्यास मर्यादा पडतात. म्हणून शिक्षित अशिक्षित, कुशल अकुशल यासारख्या श्रमिकांना मोठ्या संख्येने बेरोजगारीला तोंड द्यावे लागते.

**घर्षणात्मक बेरोजगारी :**

स्वतःच्या आवडीप्रमाणे चांगल्या रोजगाराच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगार नवीन उद्योग व्यवसायामुळे जुन्या व्यवसायातून बाहेर पडतात आणि चांगल्या रोजगाराच्या शोधात असतात. त्यांचा तो जो रोजगार शोधण्याचा कालावधी असतो तो घर्षणात्मक बेरोजगारी म्हणून मनाला जातो.

**चक्रीय बेरोजगारी :**

व्यापारी मंदीच्या परिस्थितीतून हि बेरोजगारी निर्माण झालेली असते. बाजारपेठेतील

वस्तूच्या मागणीत व पुरवठ्यात होणारे चढ उतार यामुळे हि बेरोजगारी निर्माण होते. कारण वस्तूच्या किंमती कमी झाल्यास वास्तूचे उत्पादन कमी केले जाते. उत्पादन कमी म्हणून कामगारांना कामावरून काढले जाते.

**हंगामी बेरोजगारी :**

शेती आणि काही औद्योगिक क्षेत्र या ठिकाणी मौसमानुसार उत्पादन घेतले जाते म्हणजेच बाराही महिने रोजगार उपलब्ध

असत नाही. वर्षातून काही महिने उद्योग व्यवसाय चालवण्यासाठी कामगाराची मागणी असते. नंतर त्यांना कामावरून कमी केले जाते. तेव्हा ती हंगामी स्वरूपाची बेरोजगारी ठरते. याच बरोबर तात्पुरती बेरोजगारी, ऐच्छिक बेरोजगारी, खुली बेरोजगारी, कमी प्रतीची बेरोजगारी, सौरचनात्मक बेरोजगारी, तांत्रिक बेरोजगारी, असे किती तरी प्रकार पडतात

**बेरोजगारीचे कारणे:**

भारतातील लोकसंख्या ग्रामीण आणि नागरी, अर्धनागरी विभागात विभागलेली आहे. म्हणून या भागामध्ये चालणाऱ्या उद्योग व्यवसायात श्रम करण्याची क्षमता असलेल्या सर्वानाच रोजगार मिळण्याची खात्री नसते. त्याची काही कारणे अनेक अभ्यासकांनी सांगितलेली आहेत. उदारणार्थ *"The slow growth of industrialization, quality of education, slow economic growth, shortage of means and productions are not only the various reasons for unemployment but can also be caused due to demand-side(employer) and supply-side(employee). Reasons from the demand side are low rates of job creation, an increase in the capital-labour ratio and lack of jobs for highly skilled whereas the supply side reasons can be lack of skills, work experience, job search abilities and financial resources to find a job."* देशातील लोकसंख्या प्रचंड गतीने वाढते त्या तुलनेत रोजगाराच्या संख्येत वाढ होत नाही भारतीय समाज मोठ्या प्रमाणात शेती व्यवसायावर अवलंबून आहे. मात्र मौसमानुसार शेती व्यवसायिक होत असल्याने हंगामाच्या व्यतिरिक्त मजुरांना काम मिळत नाही. त्यांनी शहराकडे धाव घेतली तरी तेथे मंदावलेल्या औद्योगिकीकरणामुळे त्यांना रोजगार उपलब्ध होत नाही. सदोष शिक्षण पद्धतीमुळे तरुणांना रोजगार उपलब्ध होत नाही. सुशिक्षित तरुण कष्टाचे काम करण्यापेक्षा बेरोजगार राहणे पसंद करतात. पैसा व भागभांडवल उभारून उद्योगधंदे उभारण्याची मानसिकता अनेकांमध्ये नसते. तसेच शिक्षण, व्यवसाय आणि रोजगार या बाबतही शासनाची धोरणे व नियोजन यात सदोषता आढळते. आर्थिक मंदीमुळे उद्योगधंद्यांची मोठे नुकसान झाल्यास नवीन रोजगार निर्माण होणे शक्य नसते. उलट कामगारांची घट केली जाते. अशा प्रकारे अनेक कारणांमुळे आजही बेरोजगारीचा दर हा वाढलेला दिसतो.

**भारतातील बेरोजगारी सद्यस्थिती:**


भारतात निम्यापेक्षा जास्त तरुणांची संख्या असून त्यातील शिक्षित, उच्चशिक्षित तरुणांना कमी श्रमात जास्त वेतन देणारी आरामदायी नोकरीची अपेक्षा असते म्हणून ते अति श्रमाच्या रोजगाराकडे दुर्लक्ष करतात. २०२० आणि २०२१ मध्ये हा बेरोजगारीचा दर ७ टक्के पेक्षा अधिक होता. लॉकडाऊन मध्ये १५ ते २३ वयोगटातील तरुण कामगारांनी कामावर जाणे शक्य नसल्याने घरी राहावे लागले. लॉकडाऊन नंतर त्यांना पूर्वीचे काम मिळाले नाही. शिवाय नोकऱ्यामध्येही घट झाली. कामगार आणि लघु उद्योग यांचा समन्वय सरकाराला साधता आला आणि म्हणून बेरोजगारीत वाढ होत गेली. १५ ते २४ या वयोगटातील बेरोजगारांची सद्यस्थिती खाली संदर्भावरून लक्षात येते.

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – V Sept – Oct 2023

OPEN ACCESS Original Research Article




स्रोत: *https://www.cmie.com/kommon/bin/sr.php?kall=warticle&dt=20230926184023&msec=816*

भारतातील तरुण लोकसंख्या, १५-२४ वयोगटातील असून २०२२-२३ मध्ये तरुणांमधील बेरोजगारीचा दर ४५.४ टक्के होता. भारताच्या ७.५ टक्क्यांच्या बेरोजगारीच्या दरापेक्षा हा धोका सहापट जास्त आहे. शिवाय, अलिकडच्या काळात मेट्रिक वाढत आहे, २०१७-१८ पासून २३ टक्क्यांहून अधिक गुणांची वाढ नोंदवली आहे. असे वरील आलेखावरून स्पष्ट होते. तसेच दोन एप्रिल २०२३ च्या इ - सकाळ वृत्तपत्रामध्ये भारतातील बेरोजगारीची सद्यस्थिती दिलेली आहे. त्यात भारतातील बेरोजगारीचा दर मार्च २०२३ मध्ये उच्चंकावर पोहचलेला सांगितलेले आहे. कर्मचाऱ्यांची कपात होत असतांना हि बेरोजगारी समोर आली आहे. असे असले तरी देशातील बेरोजगारीचा दर हा जानेवारी २०२३ मध्ये ८.३० टक्क्यावरून ७.१४ टक्कयांवर आलेला दिसतो. राजस्थान, हरियाणा, बिहार, झारखंड, महाराष्ट्र आणि जम्मू काश्मीर या राज्यांमध्ये सर्वात जास्त बेरोजगारी असल्याचे सांगितले आहे. सेवा व उद्योग क्षेत्रातील नोकऱ्या कमी झाल्याचे कारण त्यामागे असल्याचे दिसते. *(*शेळके राहुल, *Unemployment in India:*भारतातील बेरोजगारीत मोठी वाढ, या राज्यात सर्वाधिक बेरोजगार', *https://www.esakal.com/sakal-money/personal-finance/indias-unemployment-rate-rises-to-3-month-high-of-78-in-march-says-cmie-report-ras98 )*

**बेरोजगारीचे परिणाम:**

भारतामध्ये तरुणांची संख्या सर्वाधिक असून त्याना सामाजिक व राष्ट्रीय स्थैर्यासाठी रोजगार उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक असते. बेरोजगारी वाढत गेल्यानंतर त्याचे अनिष्ट परिणाम वयक्तिक व कौटुंबिक जीवनावर होतो. त्यामुळे तरुणांच्या ठिकाणी संतापजनक उद्रेक वाढत जातो. देशात समाजात अशांतता निर्माण होते. तरुणवर्ग बेकारीमुळे उदासीन बनून एकतर व्यसनाला बळी पडतो किंवा वाईट मार्गाला तरी लागतो. सामाजिक जीवनात विधायक कार्ये करण्याची त्याची मानसिकता नसते. कुटुंबामध्ये तो पैसा आणू शकत नसल्याने

मानसिक ताण तणावात राहतो. बेकार असलेल्या विवाहित तरुणाच्या कौटुंबिक जीवनात ताणतणाव निर्माण होतात. बऱ्याचदा पत्नी त्याला सोडून जाते. तसेच बेरोजगार तरुणांचे न्यूनगंड वाढत जातात. समाजामध्ये त्यांना मानपान व प्रतिष्ठा नसते मित्रमंडळी व आप्तेष्ट त्यांच्या पासून दूर जातात. परिणामी बेरोजगारीमुळे मोठ्या प्रमाणात कौटुंबिक आणि सामाजिक विघटन होताना दिसते. *"In short, because of low productivity, the economic effects of unemployment not only point to a low level of present output but also a low level of future output.-- In a nutshell, unemployment is a social evil because it undermines social justice and promotes social unrest by widening the gap between the rich and the poor." (https://www.geeksforgeeks.org/unemployment-meaning-types-causes-effects-and-remedial-measures/ )* अशा प्रकारे *geeksforgeeks.org* च्या संकेतस्थळावर बेरोजगारीचे आर्थिक व सामाजिक स्वरूपाचे अनिष्ट परिणाम सांगितले आहे.

**निष्कर्ष:**

१. कामगार किंवा मजूर म्हणून कामकरण्याची क्षमता आणि इच्छा असलेल्या श्रमिक वर्गाला रोजगार प्राप्त होत नाही. तेव्हा बेरोजगारी निर्माण झाल्याचे म्हटले जाते.

२. बेरोजगारीचा दर स्थिर राहत नाही तर त्यात चढ उतार होत राहतात.

३. १५ ते ६० ह्या वयोगटातील श्रमिक गटातील काम न करणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात भर पडत नाही.

४. भारतातील लोकसंख्येच्या तुलनेत अधिक मनुष्यबळाचा अपव्यय होतांना दिसतो कारण शिक्षित तरुणांचा भर हा नोकरी करण्याकडे असतो. नोकऱ्यांचे प्रमाण कमी असल्याने तो बेकार राहतो परंतु असंघटित अकुशल आणि शेतीविषयक क्षेत्रामध्ये काम करणे त्याला कमी पणाचे वाटते.

५. नोकऱ्या व उद्योग धंदे तसेच लघु उद्योग या बाबतची शासकीय ध्येय धोरणाची सदोषता देखील बेरोजगारी निर्माण होण्यास कारणीभूत ठरते.

६. वाढत्या लोकसंख्येमुळेही बेरोजगारी निर्माण होते.

७. बेरोजगारीमुळे वैयक्तिक कौटुंबिक सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाचे गंभीर परिणाम होत असल्याने राष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यास धोखा पोहचतो.

**उपाय:**

शासनाने एक देश एक समाज या न्यायाने संतुलित व समतोल अशी राजकीय इच्छा शक्ती प्रबळ ठेवून न्याय भूमिका घ्यावी आणि लोकसंख्या नियंत्रणात आणावी. एकीकडे शैक्षणिक विकास होत असताना दुसरीकडे समाजात 'शिक्षण म्हणजेच नौकरी' हि सामाजिक मानसिकता बदलविण्यासाठी शासन संस्था, प्रशासकीय संस्था आणि समाज माध्यमाने लोकांची मने बदलविण्याचे वातावरण निर्माण केले पाहिजे. श्रममूल्य हे सर्वात श्रेष्ठ असे जीवनमूल्य असून श्रमाला प्रतिष्ठा देण्याचे कार्य त्यांनी केले पाहिजे. कोणत्याही प्रकारचे काम हे मूल्यहीन नसते. श्रम केल्याशिवाय व्यक्तीला आणि त्याच्या कुटुंबाला त्याच्या गरजांची पूर्तता करता येत नाही. हि जाणीव प्रत्येक

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – V Sept – Oct 2023

OPEN ACCESS Original Research Article

नागरिकांमध्ये निर्माण झाली पाहिजे. रोजगाराभिमुख शिक्षण व प्रशिक्षण मोठ्या प्रमाणात शाळा महाविद्यालयातून दिले गेले पाहिजे. तरुण पिढीवर श्रम प्रतिष्ठेचे संस्कार घडविले पाहिजे. शेती व्यवसायातील नवोपक्रम, लहानमोठे उद्योग व्यवसाय आणि शासकीय, निमशासकीय, खाजगी क्षेत्रातील नौकऱ्या या बाबतचे उत्तरदायित्व म्हणून शासनाने त्यावर नियंत्रण ठेवावे. जेणे करून रोजगाराचा दर वाढेल आणि

देशाच्या आर्थिक विकासास फार मोठा हातभार लागेल.

संदर्भ:

१. डॉ.आगलावे प्रदीप *(२०१८):* भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, प्रथम आवृत्ती, नागपूर, श्रीसाईनाथ प्रकाशन, पृ. ११३.

२. कोळंबे रंजन *(२०१५) :* भारतीय अर्थव्यवस्था ,अकरावी आवृत्ती , पुणे , भगीरथ प्रकाशन , पृ.७१

३.*https://www.rba.gov.au/education/resources/explainers/unemployment-its-measurement-and-types.html)*

४.*https://dictionary.cambridge.org/dictionary/english/unemployment )*

५. शेळके राहुल, *Unemployment in India :* भारतातील बेरोजगारीत मोठी वाढ, 'या राज्यात सर्वाधिक बेरोजगार, *https://www.esakal.com/sakal-money/personal-finance/indias-unemployment-rate-rises-to-3-month-high-of-78-in-march-says-cmie-report-ras98*

***Cite This Article:***

* ***प्रा. सुरवाडे श. म., (2023).*** *भारतातील बेरोजगारी सद्यस्थिती, समस्या आणि उपाय,* ***Electronic International Interdisciplinary Research Journal****, XII, Issues – V, Sept-Oct, 2023, 51-57.*